**उलटतपास शपथेवर सुरु**

**प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधिज्ञ श्री. बी.के. हिरेमठ यांचेमार्फत सुरु -**

३६. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील व्यवहार हा माझेत व प्रतिवादी क्र.२ यांचेमध्ये झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नं.३ सोबत माझा कोणताही व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी नं.३ यांचेत कोणताही व्यवहार न झालेने त्यांचेमध्ये कोणतेही येणे देणे नाही. दावा मिळकतीची मला माहिती आहे. दावा मिळकतीचा बिगर शेती आदेश कोणी व कधी घेतला हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, प्रतिवादी नं.३ याने खरेदी करणेपूर्वी जाहीर नोटीस प्रसिध्द केली होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, सदरची नोटीस कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझा व प्रतिवादी नं.३ मध्ये कोणताही व्यवहार न झालेने माझी प्रतिवादी नं.३ विरुध्द कोणतीही मागणी नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by
GANI MANIK NADAF
Date: 2025.12.11
12:31:57 +0530

दिनांक – १०.१२.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.